आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१७ मे २०२४ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यासाठीचा प्रचार शिगेला
- मुंबईत शिवाजी पार्कवर महायुतीची, तर वांद्रे-कुर्ला संकुलात इंडीया आघाडीची प्रचार सभा
- राज्यात आतापर्यंतच्या टप्प्यात मतदान झालेल्या सर्व मतदारसंघातली मतदान यंत्र सुरक्षित, कुठंही काहीही छेडछाड झाली नसल्याचं मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांचं स्पष्टीकरण

**आणि**

- या आठवड्यात मुंबई विमानतळावरुन सुमारे साडे ११ किलो सोनं जप्त

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यासाठीचा प्रचार शिगेला पोचला आहे. पाचव्या टप्प्यासाठी येत्या २० मे रोजी मतदान होणार आहे. या टप्प्यात राज्यातल्या १३ मतदारसंघांचा समावेश आहे. या सर्व मतदारसंघांमधे प्रचार उद्या संपत असून, सर्वच राजकीय पक्षांचे नेते सभा, बैठका, पदयात्रा काढून जोरदार प्रचार करत आहेत.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज मुंबईत शिवाजी पार्क इथं मुंबईतल्या महायुतीच्या उमेदवारांसाठी आयोजित प्रचार सभेला संबोधित करत आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि अजित पवार यांच्यासह मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि इतर ज्येष्ठ नेते या सभेला उपस्थित आहेत.

मुंबईत वांद्रे-कुर्ला परिसरात इंडीया आघाडीची प्रचारसभा होत आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, ज्येष्ठ नेते शरद पवार, उद्धव ठाकरे आणि भारत आघाडीचे इतर नेते या सभेला संबोधित करणार आहेत.

**<><><><><>**

गेल्या ६० वर्षात काँग्रेसच्या कारकिर्दीत झाली नाहीत एवढी कामं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या दहा वर्षाच्या कार्यकाळात पूर्ण झाली आहेेत. यात रस्ते, सिंचन या योजनांसह मुलभुत सोयी सुविधांच्या कामांचा समावेश आहे, असं मत भाजपा नेते नितीन गडकरी यांनी व्यक्त केलं आहे. ते आज धुळे जिल्ह्यातल्या शिंदखेडा इथं महायुतीचे उमेदवार डॉ सुभाष भामरे यांच्यानिवडणूक प्रचार सभेत बोलत होते. यावेळी भाजपा प्रदेशाध्यक्ष चं्द्रशेखर बावनकुळे आणि अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

**<><><><><>**

अनिल देशमुखांना भाजपानं मंत्रिपद नाकारल्यानं ते आमच्यासोबत आले नाहीत, असा दावा राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी केला आहे. ते आज मुंबईत वार्ताहर परिषदेत बोलत होते.

**<><><><><>**

राज्यात आतापर्यंतच्या टप्प्यात मतदान झालेल्या सर्व मतदारसंघातली मतदान यंत्र सुरक्षित आहेत. कुठेही काहीही छेडछाड झाली नसल्याचं राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांनी स्पष्ट केलं आहे. ते आज मुंबईत वार्ताहर परिषदेत बोलत होते. काही ठिकाणी सीसीटीव्ही स्क्रीन बंद पडल्याच्या निमित्तानं विचारलेल्या प्रश्नाच्या उत्तरात ते बोलत होते. मतदान यंत्र सुरक्षितरित्या

ठेवलेली ठिकाणं उमेदवारांच्या स्वाक्षरीनं सीलबंद केलेली आहेत आणि सील कुणीही अजूनही कायम असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. सर्व ठिकाणांच्या सीसीटीव्हीचं रेकॉर्डिंग सुरू असून केवळ सीसीटीव्ही स्क्रीन बंद पडले होते, असा खुलासा त्यांनी केला.

पाचव्या आणि शेवटच्या टप्प्यातल्या लोकसभा मतदारसंघातल्या मतदानासाठीच्या आढाव्यासाठी निवडणूक आयोगानं आज विशेष बैठक घेतली. या सर्व मतदारसंघामध्ये मतदानाची तयारी पूर्ण झाल्याची माहिती त्यांनी दिली. अधिकाधिक मतदारांनी मतदान करावं यासाठी घरोघरी जाऊन त्यांना मतदानाचं आवाहन केलं जातंय. मतदारयादीत नाव शोधण्यासाठी मतदार voter.eci.gov.in ही वेबसाइट, वोटर हेल्पलाइन ॲप किंवा १९५० या हेल्पलाइनवर फोन करुन माहिती घेऊ शकतात.

**<><><><>**

नायगाव - जूचंद्र असा नवा बायपास तयार करून बोरीवली, कोकण रेल्वे मार्गाला जोडण्याच्या कामाला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या निर्देशानुसार मंजुरी दिल्याची माहिती रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली आहे. ते आज कांदिवली इथं कोकणवासियांच्या मेळाव्यात बोलत होते. हार्बर मार्ग बोरिवलीला जोडण्याच्या आणि वंदे भारत मेट्रो ट्रेन सुरू करण्याच्या कामांनाही मंजुरी दिल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><>**

श्रोतेहो, 'लोकनिर्णय महाराष्ट्राचा' या कार्यक्रमात आजच्या भागात आपण **'दक्षिण मुंबई'** लोकसभा मतदार संघांचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा

सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

<><><><><>

यंदाच्या १३ ते १६ मे या कालावधीत विमानतळ आयुक्तालया अंतर्गत मुंबई सीमाशुल्क विभागानं एकूण २७ प्रकरणांमध्ये ११ किलो पेक्षा जास्त वजनाच्या सोन्याची आणि सिगारेट्सची तस्करी उघडकीला आणली. बेकायदेशीर बाजारात याचं एकत्रित मूल्य ७ कोटी १६ लाख रुपये इतकं आहे. मेण, अर्धवट घडवलेले अलंकार, रोडियम प्लेटेड पैंजण, यामध्ये मिसळलेली सोन्याची भुकटी, तसंच सामनामध्ये, गुदाशयामध्ये, शरीरावर आणि बुरख्या आड लपवून होत असलेली सोन्याची तस्करी सीमाशुल्क विभागानं रोखली, आणि या प्रकरणी दोन जणांना अटक केली.

<><><><><>

राज्यात खरीप हंगामासाठी खतांचा पुरेसा साठा उपलब्ध असून, कृषी विभागानं यंदा ४४ लाख ५६ हजार टन रासायनिक खतांचा साठा मंजूर केला आहे. मे महिन्याच्या सुरुवातीपर्यंत राज्यात २९ लाख १९ हजार टन खतांचा साठा होता. उर्वरित खतांचा पुरवठा केंद्राकडून होणार आहे. खतांच्या विक्रीमध्ये काळाबाजार किंवा अन्य गैरप्रकार होत असल्याचं आढळलं तर संपर्क साधण्याचं आवाहन कृषी विभागानं केलं आहे.

<><><><><>

मालमत्ता करभरणा करण्यास टाळाटाळ करणाऱ्यांविरोधात मुंबई महानगरपालिकेनं कठोर कारवाईला सुरुवात केली आहे. या आठवड्यात

महानगरपालिकेनं विविध विभागांमधील १८० कोटी रुपये चुकवणाऱ्या २४ मालमत्तांवर जप्तीची कारवाई केली आहे. या कारवाईत चार जेसीबी, एक पोकलेनसह विविध साहित्य जप्त केलं आहे.  वरळी इथल्या शुभदा गृहनिर्माण संस्थेला ३५ कोटी ९४ लाख रुपयांचा करभरणा करण्यासाठी ४८ तासांची मुदत दिली आहे. मालमत्ता करभरण्याची अंतीम तारीख २५ मे असून त्याआधी नागरिकांनी  कर भरावा, असं आवाहन महानगरपालिकेनं केलं आहे.

**<><><><><>**

शेअर बाजाराच्या कामकाजासाठी कार्यरत सर्व्हरमध्ये बिघाड झाला तर उपलब्ध केलेल्या पर्यायी व्यवस्थेची चाचणी करण्यासाठी, उद्या मुंबई शेअर बाजार आणि राष्ट्रीय शेअर बाजाराचं विशेष लाईव्ह व्यापारी सत्र आयोजित करण्यात आलं आहे. कामकाजाच्या दोन सत्रांमध्ये त्याची विभागणी केली आहे.

सकाळी सव्वा नऊ ते रात्री दहा ही शेअर बाजाराच्या सर्वसामान्य कामकाजाची वेळ असून, पाहिलं विशेष सत्र सकाळी ९ ते ९ वाजून ८ मिनिटं या कालावधीत, तर दुसरं विशेष सत्र रात्री साडे अकरा ते साडे बारा या वेळेत आयोजित केलं जाईल. शनिवारच्या सत्रात शुक्रवारी खरेदी केलेल्या समभागांची विक्री करता येणार नाही, असं शेअर बाजारानं जारी केलेल्या निवेदनात स्पष्ट केलं आहे.

**<><><><><>**

मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे आज दिवसअखेर २५३ अंकांची वाढ झाली, आणि तो ७३ हजार ९१७ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही ६२ अंकांची वाढ नोंदवत २२ हजार ४६६ अंकांवर बंद झाला.

**<><><><><>**

धाराशिव जिल्ह्यात भीषण पाणी टंचाई निर्माण झाली आहे. जिल्ह्यातल्या ९० गावांत १३२ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. सर्वाधिक ४० टँकर भूम तालुक्यात सुरू केले आहेत.

जिल्ह्यातल्या २२६ सिंचन प्रकल्पात ४ पूर्णांक ४४ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. २२६ सिंचन प्रकल्पांपैकी ७१ प्रकल्प कोरडे पडले आहेत. १०६ प्रकल्पांत जोत्याखाली तर ३४ प्रकल्पात २५ टक्क्यांपेक्षा कमी पाणीसाठा शिल्लक राहिला आहे. सीना कोळेगाव, निम्न तेरणा हे सिंचन प्रकल्प कोरडे पडले असून मांजरा प्रकल्पात १ पूर्णांक ३७ शतांश टक्के पाणीसाठा शिल्लक राहिला आहे.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज मुंबई इंडियन्सचा सामना लखनौ सुपर जायंट्स बरोबर होणार आहे.

मुंबईतल्या वानखेडे स्टेडिअमवर थोड्याच वेळात म्हणजे साडेसात वाजता खेळला जाणार आहे.

मुंबई इंडियन्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

<><><><><>

येत्या दोन दिवसांत संपूर्ण राज्यात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह पावसाची शक्यता असून, यावेळी तुरळक ठिकाणी सोसाट्याचे वारे वाहतील असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

//<><><><><>//